सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - १०१ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. २८ मे २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

# दिल्ली दौऱ्यात फडणवीसांची मोठी मोहीम, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट

## कांदा-ऊस प्रश्नावर दिलासा शक्य; मांडल्या महत्त्वाच्या मागण्या

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८नवी दिल्ली** - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नवी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेत महाराष्ट्रातील विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली. महाराष्ट्राच्या विकासाशी संबंधित अनेक प्रकल्प, विविध अभियानं आणि राज्यासमोरील महत्त्वाच्या मुद्द्यांवर या बैठकीत चर्चा झाल्याची माहिती स्वतः फडणवीस यांनी सोशल मीडियावरून दिली. गेल्या दोन दिवसांपासून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह महायुतीतील अनेक मंत्री दिल्लीत तळ ठोकून आहेत. त्यामुळे या बैठकींना विशेष राजकीय महत्त्व प्राप्त झालं आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भेटीनंतर एक्सवर पोस्ट करत या भेटीबाबत माहिती दिली. आमचे नेते आणि देशाचे लाडके पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची आज नवी दिल्ली येथे भेट घेतली. महाराष्ट्राच्या विकासासाठी विविध विषयांवर त्यांचे मार्गदर्शन मिळाले. राज्यातील विविध प्रकल्प आणि अभियानांची माहितीही त्यांना दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं मार्गदर्शन नेहमीच सकारात्मक ऊर्जा देणारं असतं, असं त्यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे. या भेटीत केंद्र सरकारकडून महाराष्ट्रासाठी मोठ्या निर्णयांबाबत सकारात्मक संकेत मिळाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

दरम्यान, राज्यात सध्या कांदा आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे प्रश्न गंभीर बनले आहेत. कांद्याच्या दरातील चढ-उतार, निर्यातबंदी आणि शेतकऱ्यांच्या नाराजीमुळे अनेक ठिकाणी आंदोलनं झाली आहेत. दुसरीकडे ऊस उत्पादक शेतकरी आणि साखर कारखानदारांमध्येही नाराजीचं वातावरण आहे. काही साखर कारखान्यांनी केंद्र आणि राज्य



सरकारच्या धोरणांबाबत आक्षेप नोंदवले आहेत. त्यामुळे या सर्व प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी महायुती सरकारकडून दिल्ली पातळीवर प्रयत्न सुरू असल्याचं बोललं जात आहे.

काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महायुतीतील नेत्यांनी केंद्रीय गृहमंत्री तथा सहकार मंत्री अमित शहा यांचीही भेट घेतली होती. या बैठकीत कांदा आणि ऊस उत्पादकांच्या मागण्यांवर सविस्तर चर्चा झाल्याची माहिती समोर आली

### आगामी काही दिवसांत मोठ्या घोषणांची शक्यता

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीनंतर आता शेतकरी आणि राज्यातील जनतेच्या अपेक्षा वाढल्या आहेत. कांदा आणि ऊस उत्पादकांना दिलासा मिळणार का, केंद्र सरकार महाराष्ट्रासाठी कोणते मोठे निर्णय घेणार, याकडे संपूर्ण राज्याचं लक्ष लागलं आहे. महायुती सरकारकडून आगामी काही दिवसांत मोठ्या घोषणांची शक्यता वर्तवली जात असल्याने दिल्लीतील या बैठका महाराष्ट्राच्या राजकारणात आणि प्रशासनात महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याचं बोललं जात आहे.

आहे. कांद्याचा हमीभाव, निर्यातबंदी, ऊस दर आणि इतर कृषी विषयांवर केंद्र सरकारशी चर्चा करण्यात आली. सूत्रांच्या माहितीनुसार, महाराष्ट्राच्या काही प्रमुख मागण्यांबाबत केंद्र सरकार सकारात्मक असल्याचं चित्र आहे. पुढील १० दिवसांत यासंदर्भात महत्त्वाच्या घोषणा होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

राज्यात सध्या राजकीय वातावरणही चांगलंच तापलेलं आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महायुतीमधील जागावाटपावरून रस्सीखेच सुरू आहे. दुसरीकडे मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा आंदोलनाची घोषणा केली आहे. त्यामुळे राज्यातील सामाजिक आणि राजकीय परिस्थिती संवेदनशील बनली आहे. अशा वेळी राज्यातील तीनही प्रमुख नेत्यांचा दिल्ली दौरा आणि केंद्रातील वरिष्ठ नेत्यांसोबतच्या बैठका अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जात आहेत.

# पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे उद्या अमरावतीत

## प्रवीण पोटे पाटील करणार भाजप तर्फे उमेदवारी अर्ज दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि२८ अमरावती** : अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे उद्या शुक्रवार, दुपारी अमरावती दौऱ्यावर येणार असून विधान परिषद निवडणुकीसाठी भाजपचे उमेदवार प्रवीण पोटे पाटील यांच्या उमेदवारी अर्ज दाखल कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती लावणार आहेत. यावेळी बावनकुळे हे भाजपचा अधिकृत 'बी फॉर्म' प्रवीण पोटे पाटील यांना सुपूर्त करणार असल्याची माहिती पक्ष सूत्रांकडून देण्यात आली आहे.उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी शहरातील जनसंपर्क कार्यालयात भाजप पदाधिकारी व



कार्यकर्त्यां ची महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली आहे. बैठकीनंतर मोठ्या रॅलीच्या माध्यमातून कार्यकर्ते जिल्हाधिकारी कार्यालयाकडे रवाना होणार आहेत. या कार्यक्रमासाठी जिल्हाभरातील भाजप कार्यकर्त्यां मध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून मोठ्या प्रमाणावर शक्तिप्रदर्शनाची तयारी सुरू आहे.उमेदवारी अर्ज दाखल प्रक्रियेदरम्यान भाजपचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, विविध आघाड्यांचे कार्यकर्ते तसेच समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. घोषणाबाजी, ढोल-ताशे आणि रॅलीच्या माध्यमातून भाजपकडून जोरदार वातावरण निर्मिती केली जाणार असल्याचे सांगितले जात आहे.दरम्यान, आगामी विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या उमेदवारी अर्ज दाखल कार्यक्रमाकडे संपूर्ण जिल्ह्याचे राजकीय लक्ष लागले आहे. भाजपकडून ही निवडणूक प्रतिष्ठेची मानली जात असून पक्ष संघटनाही पूर्ण ताकदीने मैदानात उतरल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

# नसरापूर प्रकरणात न्यायालयाचा मोठा निर्णय; २८ दिवसांत आरोप निश्चित

## आता रोज सुनावणी; निर्घृण कृत्यानंतर न्यायालय कठोर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८पुणे**- पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यात घडलेल्या नसरापूर अत्याचार आणि हत्या प्रकरणात न्यायालयाने मोठा निर्णय घेत आरोपीविरोधात अवघ्या २८ दिवसांत आरोप निश्चित केले आहेत. या गंभीर प्रकरणाची आता फास्टट्रॅक पद्धतीने सुनावणी होणार असून रोज 'इन कॅमेरा' पद्धतीने खटला चालवला जाणार आहे. न्यायालयाने आरोपीविरोधात प्रथमदर्शनी पुरावे असल्याचे निरीक्षण नोंदवल्याने या प्रकरणाला आता निर्णायक वळण मिळालं आहे. या घटनेमुळे संपूर्ण राज्य हादरलं असताना न्यायव्यवस्थेने घेतलेल्या वेगवान भूमिकेचं स्वागत केलं जात आहे.

या प्रकरणातील आरोपीला पहिल्यांदाच प्रत्यक्ष न्यायालयात हजर करण्यात आलं. सुनावणीदरम्यान आरोपीच्या वकिलांकडून आरोप निश्चितीला विरोध करण्यात आला. मात्र तपास यंत्रणेकडून सादर करण्यात आलेल्या पुराव्यांच्या आधारे न्यायालयाने आरोपीविरोधात आरोप निश्चित केले. या प्रकरणात पोलिसांनी अवघ्या १५ दिवसांत दोषारोपपत्र दाखल केलं होतं. त्यानंतर लैंगिक तपासणी अहवाल, सीसीटीव्ही फुटेज आणि इतर



महत्त्वाचे पुरावे न्यायालयासमोर मांडण्यात आले. त्याची पडताळणी झाल्यानंतर न्यायालयाने पुढील सुनावणी रोज घेण्याचा निर्णय दिला.

रोज होणाऱ्या 'इन कॅमेरा' सुनावणीकडे संपूर्ण राज्याचं लक्ष

नसरापूर प्रकरणामुळे राज्यभरातून तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. चिमुकलीला न्याय मिळावा आणि आरोपीला कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी सर्व स्तरातून केली जात आहे. न्यायालयाने या प्रकरणाची जलदगतीने सुनावणी सुरू केल्याने पीडित कुटुंबाला काहीसा दिलासा मिळाला आहे. आता रोज होणाऱ्या 'इन कॅमेरा' सुनावणीकडे संपूर्ण राज्याचं लक्ष लागलं असून या प्रकरणात कठोर निर्णयाची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# ओबीसी आरक्षणाला धक्का लावल्यास गाठ आमच्याशी

## ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांचा मनोज जरांगे पाटलांवर हल्लाबोल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८पुणे**- ओबीसी आरक्षणाला धक्का लावल्यास गाठ आमच्याशी असेल, असा इशारा ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी दिला आहे. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनावर टीका करताना हाके यांनी हे आंदोलन म्हणजे लोकशाही आणि आरक्षणाचे अज्ञान असल्याचे म्हटले. पुण्यात पत्रकारांशी बोलताना त्यांनी जरांगे पाटील यांच्या मागण्या कायद्याच्या कसोटीवर टिकणार नाहीत, असे स्पष्ट केले.

हाके म्हणाले की, मनोज जरांगे पाटील यांचे आंदोलन म्हणजे लोकशाही आणि आरक्षणाचे कवडीचेही ज्ञान नसलेल्या माणसाच्या हातात गेलेला पोरखेळ आहे. सरकारने त्यांच्यासाठी नेहमीच 'रेड कार्पेट' घातले असून, त्यांच्या दबावाखाली येऊन काढलेले सरकारी नोटिफिकेशन पूर्णपणे बेकायदेशीर आहे.

जरांगे पाटील यांच्या नवव्या उपोषणावर बोलताना हाके यांनी त्यांना उपरोधिक सदिच्छा दिल्या. ते म्हणाले, याआधी ८ वेळा उपोषण झाले आहे, आता



हे नववे उपोषण सुरू आहे. पाच पिढ्यांचे नुकसान झाल्याचा दावा जरांगे करत आहेत, पण मग यामुळे फायदा नेमका कुणाचा झाला? मुळात मराठा समाजातील गरिबीला ओबीसी आरक्षण कसे काय जबाबदार असू शकते? त्यांनी जरांगे पाटलांना बजेटमध्ये ओबीसींसाठी किती निधी येतो, याचे आत्मपरीक्षण करण्यास सांगितले. पुढाऱ्यांनी आणि सहकार महर्षींनीच संपत्तीचे केंद्रीकरण करून मराठा समाजाची फसवणूक केल्याचा आरोपही त्यांनी केला.

जरांगे दादा, तुम्ही गरजवंतांचा लढा उभा केलात, पण त्याचा फायदा नेमका कोणी घेतला याचा विचार करा. तुमचे मन मोठे करा आणि सर्व समाजाच्या प्रश्नांवर एकत्र या, आम्ही तुमच्यासोबत उभे राहायला तयार आहोत, असे आवाहनही शेवटी हाके यांनी केले.

# रॉयल्टी फ्री माती, वीज दरात सवलत

## वीटभट्टी व्यावसायिकांसाठी सरकारची घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती**- पारंपरिक कुंभारकाम, वीटभट्टी व्यवसायाला ऊर्जितावस्था देण्यासाठी राज्य सरकारने उपाय केले. पिढीजात कुंभार कुटुंबांना वर्षाला तब्बल ७०० ब्रासपर्यंत माती विनामूल्य आणि कोणतीही रॉयल्टी (स्वामित्वधन) न भरता उचलता येणार आहे.

पिढीजात कुंभार कुटुंबांना माती उत्खननासाठी रॉयल्टी आकारली जाणार नाही. वर्षाला ७०० ब्रासपर्यंत माती पूर्णपणे विनामूल्य उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.योजनेंतर्गत वर्षात सुमारे नऊ महिने माती उत्खनन करता येणार



आहे. मात्र, एकूण मर्यादा ७०० ब्रास इतकी निश्चित करण्यात आली आहे. या मर्यादेपलीकडे उत्खनन केल्यास नियमानुसार कारवाई केली जाईल.नदी, नाले तसेच सरकारी पडीक जमिनीतून केवळ कुंभार व्यवसायासाठी माती उपसा केल्यास आणि तो ठरलेल्या मर्यादेत असल्यास कोणताही दंड आकारला जाणार नाही.वीजनिर्मिती केंद्रांमधून निर्माण होणारी राखदेखील वीटभट्टीसाठी मोफत उपलब्ध करून देण्याची तरतूद करण्यात आली आहे. यामुळे पारंपरिक मातीवरील अवलंबित्व कमी होईल.आता वीटभट्टी व्यवसायासाठी सलग पाच वर्षांची परवानगी मिळेल. यामुळे दरवर्षी परवानगी नूतनीकरणाची प्रक्रिया टाळता येणार आहे.पात्र कुंभार व्यावसायिकांना विशेष प्रमाणपत्राच्या आधारे वीटभट्टी साठी वापरल्या जाणाऱ्या वीज दरात सवलत देण्याचा प्रस्ताव लवकरच लागू होणार आहे. यामुळे उद्योगाचा आर्थिक भारजातीचा दाखला वा पारंपरिक कारागीर असल्याचा ग्रामपंचायत /नगरपालिकेचा दाखला. सातबारा उतारा किंवा वीटभट्टीच्या जागेचे संमतीपत्र. मागील वर्षाच्या वीटभट्टी परवान्याची प्रत.आपल्या क्षेत्रातील तहसीलदार कार्यालय (महसूल विभाग) किंवा जिल्हा खनिकर्म अधिकारी यांच्याकडे करा.

> पारंपरिक कुंभार समाज आणि छोट्या वीटभट्टी व्यावसायिकांना आर्थिक बळ देणे हा या धोरणाचा मुख्य हेतू आहे. व्यावसायिकांनी या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, प्रशासनाकडून त्यांना पूर्ण सहकार्य केले जाईल.
>
> **- विजय लोखंडे**
> **तहसीलदार, अमरावती.**

# राज्यातील अकरावी प्रवेश पोर्टलमध्ये वंचित महाविद्यालयांचा समावेश करा

## शिक्षण संचालकांचे आदेश; उपसंचालकांवर जबाबदारी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८मुंबई**- राज्यातील अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत वंचित राहिलेल्या ५५ ते ६० अनुदानित कनिष्ठ महाविद्यालयांचा समावेश करण्याचा निर्णय शिक्षण विभागाने घेतला असून, त्यासाठी प्रत्येक शिक्षण उपसंचालकांवर जबाबदारी निश्चित करत शिक्षण संचालकांनी आदेश जारी केले आहेत.माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी विभागीय शिक्षण उपसंचालकांच्या दुर्लक्षामुळे यादीत न आलेल्या कनिष्ठ महाविद्यालयांमुळे संभ्रम निर्माण झाल्याने, संबंधित महाविद्यालयांचा तातडीने समावेश करण्याचे आदेश दिले. अकरावी ऑनलाइन प्रवेश



प्रक्रियेची शून्य फेरी १० एप्रिल ते २० मेपर्यंत चालली. त्यानंतर २१,२२ मे रोजी दोन दिवस तांत्रिक अडथळ्यामुळे लाखो विद्यार्थी, पालक वैतागले होते. दरम्यान, राज्यातील एकूण ५५ ते ६० कनिष्ठ महाविद्यालयांची नावे शासनाच्या यादीत नसल्याचे समोर आले. लातूरमधील १०, जळगावमधील ५ आणि इतर जिल्ह्यांतील महाविद्यालये वगळल्याने गोंधळ झाला. विद्यार्थ्यांना आपल्या भागातील अनुदानित कनिष्ठ महाविद्यालय हवे असताना ते पोर्टलवर दिसतच नव्हते. त्यामुळे गोंधळ झाल्याचे कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक संघटनेचे सरचिटणीस मुकुंदराव आंधळकर यांनी म्हटले आहे.

विभागीय शिक्षण उपसंचालकांना पूर्वसूचना देऊनही वेळेत याद्या अद्ययावत न केल्याने काही महाविद्यालयांची नावे प्रवेश प्रक्रियेत राहिली. त्यामुळेच प्रसारमध्यमातून बातम्या प्रसिद्ध झाल्या आहेत. त्या पार्श्वभूमीवर पुढील अडचणी टाळण्यासाठी प्रत्येक विभागीय शिक्षण उपसंचालकांकडे अनुदानित कनिष्ठ महाविद्यालयांची नावे समाविष्ट करण्याची जबाबदारी सोपवण्यात आली असून, ही प्रक्रिया ४ जून २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत.

### हवे ते महाविद्यालय मिळणार

पूर्वसूचना देऊनही कामकाज व्यवस्थित केले नसल्याची नाराजी आदेश पत्रात अधिकाऱ्यांच्या गोंधळामुळे महाविद्यालये पोर्टलवर दिसली नाहीत. विद्यार्थ्यांना हवे असलेल्या कनिष्ठ महाविद्यालयाची प्रवेशासाठी निवड करता येणार आहे.

## संपादकीय ......

# झुंजार स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर हे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतिकारक, समाजसुधारक, लेखक, कवी व तत्त्वज्ञ होते. त्यांचा जन्म २८ मे १८८३ रोजी नाशिक जिल्ह्यातील भगूर येथे झाला. लहानपणापासूनच त्यांच्यावर देशभक्तीचे संस्कार झाले. वयाच्या बाराव्या वर्षी त्यांनी 'वंदे मातरम' पथक स्थापन केले. पुढे पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयात शिकत असताना त्यांनी 'अभिनव भारत' ही गुप्त क्रांतिकारी संघटना उभारली. उच्च शिक्षणासाठी सावरकर लंडनला गेले. तेथे त्यांनी 'इंडिया हाऊस'मध्ये राहून क्रांतिकार्याला गती दिली. त्यांनी लिहिलेला '१८५७ चे स्वातंत्र्यसमर' हा ग्रंथ ब्रिटिशांनी जप्त केला. तरीही तो जगभर पोहोचला. १९१० मध्ये त्यांना अटक झाली. मार्सेलिस बंदरातून निसटण्याचा त्यांनी केलेला प्रयत्न जगप्रसिद्ध आहे.

ब्रिटिश सरकारने त्यांना दोन जन्मठेपांची शिक्षा देऊन अंदमानच्या काळ्या पाण्यावर पाठवले. सेल्युलर जेलमध्ये त्यांनी अनन्वित छळ सहन केला. तुरुंगाच्या भिंतींवर खिळ्याने महाकाव्य लिहिले. १९२४ मध्ये सुटकेनंतर त्यांना रत्नागिरीत स्थानबद्ध करण्यात आले. तेथे त्यांनी अस्पृश्यता निर्मूलन, शुद्धी चळवळ, भाषाशुद्धी व विज्ञाननिष्ठ समाजरचनेसाठी कार्य केले. पतितपावन मंदिर बांधून सर्वांसाठी खुले केले. 'हिंदुत्व' या संकल्पनेची त्यांनी मांडणी केली. हिंदू समाज संघटित व्हावा यासाठी हिंदू महासभेचे नेतृत्व केले. सावरकर हे प्रतिभावंत साहित्यिक होते. 'कमला', 'काळे पाणी', 'माझी जन्मठेप', 'सहा सोनेरी पाने' ही त्यांची गाजलेली पुस्तके. त्यांनी मराठी भाषेत अनेक नवे शब्द रूढ केले. 'महापौर', 'दिग्दर्शक', 'चित्रपट', 'विधिमंडळ' हे शब्द त्यांचीच देणगी आहेत. संपूर्ण आयुष्य मातृभूमीसाठी समर्पित करणार्या या तेजस्वी क्रांतिसूर्याने स्वेच्छेने प्रायोपवेशन स्वीकारले. अन्न, पाणी व औषध त्यागून त्यांनी देहत्यागाचा मार्ग पत्करला. त्यांचे निधन २६ फेब्रुवारी १९६६ रोजी मुंबई येथे झाले.

अंदमानातून सुटल्यानंतर सावरकरांना ब्रिटिशांनी रत्नागिरीत स्थानबद्ध केले. (१९२४ जाने. ६)१८ हिंदू समाज एकजीव आणि संघटित करण्यासाठी सावरकरांनी रत्नागिरीत राहून कार्य केले. हिंदू समाजाच्या अधःपतनाला जातिव्यवस्था, चातुर्वर्ण्य (१९३० नोव्हें.) जबाबदार आहे, हे सावरकरांनी लक्षात घेऊन त्या विरोधात काम केले. हिंदू धर्मात जातिव्यवस्थेचे, विषमतेचे समर्थन आहे. त्यामुळेच हिंदूसंघटन करण्यासाठी सावरकरांनी धर्मचिकित्सेची तलवार उपसली. आपल्या लेखनाने कोणी सनातनी दुखावेल याची चिंता न करता अंधश्रद्धा, जातिभेद यांवर त्यांनी कडाडून टीका केली.१९ स्वकीयांतील जातीयतेवरपण निर्भीड टीका केली. त्यांनी रत्नागिरीमधील वास्तव्यामध्ये अनेक समाजसुधारणा केल्या. जवळपास ५०० मंदिरे अस्पृश्यांसाठी खुली केली. अनेक आंतरजातीय विवाह लावले. अनेक सहभोजने आयोजित केली. त्यांनंतर सर्वांसाठी 'पतित पावन मंदिर' सुरू केले व सर्वांसाठी सामाईक भोजनालयही सुरू केले. संदर्भ हवा जातिभेद तोडण्यासाठी सहभोजनाचा धडाका उडवून दिला. रत्नागिरी येथे त्यांनी भागोजीशेठ कीर यांच्या सहकार्याने पतितपावन मंदिर स्थापन केले.२० या मंदिरात सर्व जातींच्या लोकांना प्रवेश दिला.२१ सुमारे १५ आंतरजातीय विवाहही त्यांनी लावून दिले.२२ विठ्ठल रामजी शिंदे यांच्या २८ डायरीजमध्ये सावरकर आणि विठ्ठल रामजी शिंदे यांनी मिळून आयोजित केलेल्या सर्वजातीय भोजनांचे संदर्भ मिळतात. ही हस्तलिखिते राष्ट्रीय पांडुलिपी मिशनच्या संकेतस्थळावर तालिकीकरण केलेली आहेत.रत्नागिरीत सावरकर सुमारे १३ वर्षे स्थानबद्धतेत होते. इ.स. १९३७ पासून सुमारे सात वर्षे, सावरकरांनी हिंदू महासभेचे अध्यक्षपद भूषविले. झंझावाती दौरे, मोठ्यामोठ्या सभा, हिंदूंची सैन्यभरती, रॉयल क्लब्सची स्थापना अशा अनेक मार्गांनी त्यांनी हिंदू महासभेचे कार्य केले. त्यांनी आधुनिक विचारधारेप्रमाणे बुद्धिवाद व विज्ञाननिष्ठा यांची कास धरून हिंदू धर्मात सुधारणा करण्यासाठी लढा दिला.२३ एक क्रांतिकारक, ज्वलंत साहित्यिक (महाकवी), समाजसुधारक, हिंदू संघटक या पैलूंसह स्वातंत्र्यवीर सावरकरांनी भारतीय समाज ढवळून काढला, स्वातंत्र्यलढ्यात अभूतपूर्व योगदान दिले. फाळणीला व तत्कालीन काँग्रेसच्या धोरणांना त्यांनी प्रखर विरोध केला. स्वातंत्र्यानंतरही त्यांनी सीमांची सुरक्षा, सैनिकांची संख्या वाढवणे, शस्त्रसज्जता अशा अनेक विषयांचा आग्रह त्यांनी धरला. सुमारे ६० वर्षे त्यांनी स्वातंत्र्य व सुराज्य यांसाठी अथक परिश्रम घेतले. इ.स. १९६६ मध्ये वयाच्या ८३ व्या वर्षी त्यांनी प्रायोपवेशनाचा निर्णय घेतला. १ फेब्रुवारी १९६६ रोजी त्यांनी अन्न, पाणी आणि औषधाचा त्याग करण्याचा निर्णय घेतला. अन्नत्याग केल्यानंतर २६ फेब्रुवारी १९६६ रोजी त्यांचे प्राण पंचतत्त्वात विलीन झाले.

# राजकीय पक्षांना पडला गुणवंतांचा विसर

## निवडणूक आली की गुणगौरव; विद्यार्थ्यांच्या यशाकडे राजकीय पक्षांची पाठ

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८अमरावती**

एकेकाळी दहावी-बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यासाठी राजकीय पक्ष, सामाजिक संघटना आणि नेत्यांमध्ये चढाओढ लागायची. भव्य गुणगौरव सोहळे, मंचावर विद्यार्थ्यांचा सत्कार, भेटवस्तूंचा वर्षाव आणि मोठमोठ्या घोषणा असे चित्र दरवर्षी पाहायला मिळायचे. मात्र, गेल्या दोन वर्षांपासून हे चित्र जवळपास गायब झाले असून, 'राजकीय पक्षांना गुणवंत विद्यार्थ्यांचा विसर पडला का?' असा संतप्त सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. दहावी आणि बारावीच्या निकालाला जवळपास महिना उलटला आहे. प्रवेश प्रक्रिया देखील अंतिम टप्प्यात पोहोचली आहे.

अनेक विद्यार्थी पुढील शिक्षणासाठी बाहेरगावी जाण्याच्या तयारीत आहेत. तरीदेखील शहरात पूर्वीसारखे एकही मोठे गुणगौरव सोहळे दिसून आले नाहीत. शाळा आणि महाविद्यालये आपल्या स्तरावर विद्यार्थ्यांचा गौरव करत आहेत. मात्र, समाजाचे नेतृत्व करण्याचा दावा करणारे राजकीय पक्ष या विषयात निष्क्रिय दिसत आहेत. विशेष म्हणजे, पूर्वी निवडणुका जवळ आल्या की, गुणवंत



विद्यार्थ्यांच्या सत्कारासाठी राजकीय पक्ष उत्साहाने पुढे सरसावत होते.

विद्यार्थ्यांना सायकली, पुस्तके, ट्रॉफी, रोख बक्षिसे देत 'शिक्षणप्रेमी' चेहरा निर्माण करण्याचा प्रयत्न होत असे. मात्र, आता निवडणूक नसल्याने गुणवंत विद्यार्थ्यांबद्दलची आस्था देखील कमी झाली का, असा सवाल पालक विचारत आहेत. काही पालकांनी तर नाराजी व्यक्त करत सांगितले की, 'विद्यार्थ्यांनी वर्षभर मेहनत करून यश मिळवायचं आणि त्यांचं कौतुक फक्त सोशल मीडियापुरतंच मर्यादित राहायचं का?

समाजातील राजकीय नेत्यांनी पुढे येऊन विद्यार्थ्यांचा सन्मान करायला हवा. आजचे गुणवंत विद्यार्थी हेच उद्याचे अधिकारी, डॉक्टर, अभियंते आणि समाजाचे नेतृत्व करणारे नागरिक आहेत. गावाचं नाव राज्य आणि देशपातळीवर उज्वल करणार्!या या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्याची जबाबदारी फक्त शाळांची नसून समाज आणि राजकीय पक्षांचीही आहे. आज राजकीय पक्षांकडून सभा, मोर्चे, वाढदिवस, शक्तिप्रदर्शनासाठी लाखो रुपये खर्च केले जातात. मग गुणवंत विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देण्यासाठी वेळ आणि निधी का मिळत नाही?

असा थेट प्रश्न आता नागरिक विचारत आहेत. गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान हा केवळ कार्यक्रम नसून पुढील पिढीला प्रेरणा देणारा संस्कार आहे. त्यामुळे राजकीय पक्षांनी आता तरी जागे होऊन विद्यार्थ्यांच्या यशाचा गौरव करावा, अशी अपेक्षा सुज्ञ नागरिक व्यक्त करत आहेत.

# पावसाळ्यापूर्वी पाणंद रस्ते पूर्ण करा

### तहसीलदारांवर कारवाईची बिरसा ब्रिगेडची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८शिराळा** - मुख्यमंत्री बळीराजा शेतपाणंद रस्ते योजनेची अमरावती तालुक्यात प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचा आरोप करीत, कामात दिरंगाई करणाऱ्या तहसीलदारांवर तत्काळ कारवाई करावी, अशी मागणी बिरसा ब्रिगेडचे जिल्हा उपाध्यक्ष मनीष धुर्वे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. पावसाळ्यापूर्वी रखडलेली कामे पूर्ण न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. महसूल व वनविभागाच्या शासननिर्णयानुसार पाणंद रस्ते योजना प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच २५ मार्च २०२६ च्या शासन शुद्धिपत्रकानुसार गावनकाशावरील शासकीय पाणंद रस्त्यांवरील अतिक्रमणे सात दिवसांत हटविणे बंधनकारक करण्यात आले आहे. मात्र अमरावती तालुक्यात अनेक ठिकाणी अद्यापही अतिक्रमणे कायम असून अनेक रस्ते बंद असल्याने शेतकऱ्यांना दळणवळणासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. २०२४ व २०२५ मध्ये सुरू झालेली अनेक पाणंद रस्त्यांची कामे अद्याप अपूर्ण आहेत. काही ठिकाणी कामे अर्धवट असतानाही अनुदानाची देयके काढण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे. अधिकाऱ्यांच्या दिरंगाईमुळे शासनाच्या उद्देशालाच हरताळ फासला जात असून शेतकऱ्यांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली आहे, असे धुर्वे यांनी म्हटले आहे. योजनेच्या प्रभावी अंमलबजावणी साठी तालुकास्तरा वर सर्व संबंधित विभागांची संयुक्त आढावा बैठक तातडीने घेण्यात यावी, प्रलंबित प्रस्तावांची यादी तयार करून निश्चित कालमर्यादा ठरवावी तसेच गावनिहाय प्रगती अहवाल सादर करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणीही करण्यात आली आहे.-

# राजकमल, नेहरू मैदान, राजापेठ, बापट चौकात मनपा अतिक्रमण विभागाची धडक

## मध्यरात्री 'घुमंतूंवर' कारवाई, बेड्यावर सोडले



### अनेक घुमतू गेले पळून

प्रशासनाने मोठ्या पोलीस बंदोबस्त तैनात करून अचानक कारवाई सुरू केली, तेव्हा २५०पेक्षा अधिक भटके पळून गेले. सकाळी अडीच ते तीन वाजेपर्यंत ही कारवाई चालली. यामध्ये चार ट्रक साहित्य जप्त करण्यात आले. राजकमल चौक, श्याम चौक, बापट चौक, राजापेठ, नेहरू मैदान या ठिकाणावरील सुमारे २५० घुमतुंना त्यांच्या बेड्यावर सोडून देण्यात आले.

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८अमरावती-**

शहराच्या मध्यवर्ती भागातील ऐतिहासिक नेहरू मैदान परिसर अखेर अतिक्रमणमुक्त करण्यात महानगरपालिका प्रशासनाला मोठे यश मिळाले आहे. अनेक वर्षांपासून भटक्या जमातींचा ताबा, वाढते अतिक्रमण, अस्वच्छता आणि कायदा-सुव्यवस्थेच्या प्रश्नांनी वेढलेल्या या परिसरावर मनपाने धडक कारवाई करत तब्बल २५० पारधी कुटुंबांना हटवले. शहर कोतवाली पोलीस आणि महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या संयुक्त मोहिमेमुळे संपूर्ण परिसर प्रशासनाच्या ताब्यात आला असून, आता नेहरू मैदानाचा कायापालट करण्यासाठी मनपाने मास्टर प्लॅन तयार केला आहे.

### पुन्हा दोन दिवसानंतर कारवाई

घुमंतू एकदा उठविल्यानंतर पुन्हा त्याच ठिकाणी डेरा मांडत असल्याने आता पुन्हा दोन दिवसानंतर शुक्रवारला या सर्व ठिकाणावर कारवाई करण्यात येणार आहे, अशी माहिती मनपाच्या वतीने देण्यात आली.

सन १९२८ मध्ये स्थापन झालेलीनेहरू मैदान येथील गोखले स्मारक शाळा ही शहराच्या इतिहासाचा महत्त्वाचा भाग मानली जाते.

मात्र गेल्या काही वर्षांत या परिसराची अवस्था अत्यंत बिकट झाली. मैदान परिसरातटाऊन हॉल सुद्धा आहे. महापालिकेचे उद्यान असल्याने नेहरू मैदान हा परिसर हिरवागार आहे. त्यामुळे या परिसरात पारधी समाजातील परिवारांनी अतिक्रमण केले होते. अनेकदा मनपाप्रशासनाकडून ही कारवाई करण्यात आली, मात्र दोन दिवसातच हे पारधी पुन्हा परत यायचे त्यामुळे ही ऐतिहासिक शाळा चोरीचे ठिकाण बनली होती.

# जिल्ह्यात शेतकऱ्यांची फसवूणक थांबणार

## खत उत्पादनांच्या टॅगिंगवर शासनाकडून बंदी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८अमरावती**

शेतकरी, लोकप्रतिनिधी आणि डिलर्स असोसिएशनकडून प्राप्त झालेल्या तक्रारींची दखल घेत राज्य शासनाच्या कृषी विभागाने एक अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.राज्यात काही खत उत्पादक आणि मार्केटिंग कंपन्यांकडून अनुदानित रासायनिक खतांच्या विक्रीसोबत विना-अनुदानित खते, सूक्ष्म अन्नद्रव्ये, जैवखते आणि जैवउत्तेजके यांची सक्तीने विक्री (टॅगिंग/लिंकिंग) केली जात असल्याचे समोर आले होते. या पार्श्वभूमीवर, शासनाने २० मे रोजी विशेष परिपत्रक काढून अशा प्रकारच्या टॅगिंगवर तत्काळ प्रभावाने बंदी घातली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची फसवणूक थांबणार आहे. केंद्र सरकारच्या रसायने व खते मंत्रालयाने खतांसोबत इतर उत्पादनांचे टॅगिंग करणे बेकायदेशीर आणि अन्यायकारक असल्याचे आधीच स्पष्ट केले आहे.शेतकऱ्यांचे



हित आणि खरीप हंगामाची तातडी लक्षात घेता, आता खत कंपन्यांना त्यांच्या परवान्यातील अनुदानित रासायनिक खते सोडून इतर कोणत्याही विना-अनुदानित खतांचा किंवा निविष्ठांचा पुरवठा व विक्री करण्यास पूर्णपणे मनाई करण्यात आली आहे. यवतमाळ जिल्ह्यात या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर थेट कायदेशीर आणि कठोर प्रशासकीय कारवाई केली जाणार आहे.

# पाचही झोनला यशवंत पाटील, जणगणना संचालनालाय उप महाराजिस्ट्रार यांची भेट

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती,** यशवंत पाटील, जणगणना संचालनालाय उप महाराजिस्ट्रार तसेच योगेश पीठे, उपायुक्त तथा शहर जनगणना अधिकारी यांनी आज पाचही झोनला भेट देऊन सुरू असलेल्या जनगणना कामाचा आढावा घेतला.या भेटीदरम्यान जनगणना कक्ष व विविध गटांना प्रत्यक्ष भेट देऊन कामकाजाची पाहणी केली. त्यांनी प्रगणक व पर्यवेक्षक यांच्याशी थेट संवाद साधून माहिती संकलन प्रक्रियेची सद्यस्थिती, कामातील प्रगती, तसेच येणाऱ्या अडचणी याबाबत सविस्तर चर्चा केली. कामाची गती, अचूकता आणि वेळेत पूर्ण होणारे उद्दिष्ट याबाबतही त्यांनी



माहिती घेतली.प्रगणकांकडून जमा होणारी माहिती ही पर्यवेक्षकांनी अत्यंत काटेकोरपणे तपासून, शहानिशा करूनच पुढील प्रक्रियेसाठी पाठवावी, असे स्पष्ट निर्देश दिले. माहितीची गुणवत्ता आणि अचूकता राखणे अत्यंत आवश्यक असून कोणतीही त्रुटी राहू नये, यावर त्यांनी विशेष भर दिला.तसेच जनगणना कामामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून काम अधिक प्रभावी आणि पारदर्शक पद्धतीने पार पाडावे, अशा सूचनाही त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. क्षेत्रीय स्तरावर काम करताना समन्वय राखणे आणि वेळेचे काटेकोर पालन करणे यावरही त्यांनी मार्गदर्शन केले.या भेटी दरम्यान सहा.आयुक्त नंदकिशोर तिखिले, भुषण पुसतकर, नितीन बोबडे, धनंजय शिंदे, मनोज शहाळे, सहा. जनगणना अधिकारी अक्षय निलंगे उपस्थित होते.

# राणांच्या दोन शिलेदारांनी धरला बच्चू कडूंचा हात

## नीलेश भेंडे शिवसेनेत तर मारोटकर यांचा प्रहारमध्ये प्रवेश



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती** आ. रवी राणा यांच्या युवा स्वाभिमान पक्षाचे धुरंधर कार्यकर्ते नीलेश भेंडे व गणेश मारोटकर यांनी युवा स्वाभिमान पक्षाची साथ सोडत आ. बच्चू कडू यांच्यासोबत जाणे पसंत केले आहे. नीलेश भेंडे हे युवा स्वाभिमान पक्षाच्या विद्यार्थी सेलचे जिल्हाध्यक्ष तर गणेश मारोटकर हे युवा स्वाभिमान पक्षाच्या व्यापारी-हातगाडी व्यावसायिक सेलचे जिल्हाध्यक्ष होते.युवा स्वाभिमान पक्षाच्या हॉकर्स युनियनचे जिल्हाध्यक्ष गणेश मारोटकर यांनी वर्षभरापूर्वीच युवा स्वाभिमान पक्षाला रामराम ठोकला होता. मागील वर्षी महापालिकेने शहरातील फूटपाथवरील अतिक्रमण हटविण्याची मोहीम मोठ्याप्रमाणात राबविली होती. गोरगरीब हातगाडी व्यावसायिकांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळली होती. याविरोधात गणेश मारोटकर यांनी मागीलवर्षी भरपावसात फेरीवाल्यांना सोबतीला घेऊन मोठे आंदोलन छेडले होते. परंतु या आंदोलनात मारोटकर यांना णा दाम्पत्य अथवा युवा स्वाभिमान पक्षाकडून पाठबळ ळाले नव्हते. मारोटकर यांनी ही लढाई एकांकी लढली होती. व्हापासूनच त्यांनी युवा स्वाभिमान पक्षासोबत दुरावा ठेवला ता. त्यांनी शहीद भगतसिंग हॉकर्स युनियन नावाने संघटना बरून आपली चळवळ सुरू ठेवली होती. दरम्यान प्रहार टनेत मारोटकर यांनी आ. बच्चू कडू यांच्या उपस्थितीत प्रवेश केला आहे. यावेळी त्यांच्यावर आ. कडू यांनी हॉकर्स युनियनच्या जिल्हाध्यक्ष पदाची जबाबदारी सोपविली आहे. जिल्हाध्यक्ष राहिलेले नीलेश भेंडे यांनीही युवा स्वाभिमान यासह युवा स्वाभिमान पक्षाच्या विद्यार्थी संघटनेचे पक्षाला रामराम ठोकून आ. बच्चू कडू यांच्या नेतृत्वात शिवसेना शिंदे गटात जाहीर प्रवेश केला आहे. युवा स्वाभिमान पक्षाच्या विद्यार्थी संघटनेचे शहराध्यक्ष अनुप अग्रवाल व नीलेश भेंडे यांच्यात काही दिवसांपासून धुसफूस सुरू होती. त्यांच्यातील हा वाद एकमेकांवर जीवघेणा हल्ला करण्यापर्यंत पोहोचला होता. आ. रवी राणा यांच्या निवासस्थानासमोरील एका व्यापारी संकुलात बसून असलेल्या नीलेश भेंडे यांच्यावर प्राणघातक हल्लाचढविण्यात आला होता. तेव्हापासून भेंडे हे युवा स्वाभिमान पक्षापासून अंतर ठेवून होते. आता त्यांनी आ. बच्चू कडू यांच्या नेतृत्वात शिवसेना शिंदे गटात प्रवेश घेतला आहे. आ. रवी राणा यांच्या नीलेश भेंडे व गणेश मारोटकर या दोनही शिलेदारांनी आ. बच्चू कडू यांचा हात धरला आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# अवैध एचबीटी कापूस बियाण्यांचा कारखाना

## आर्वीत कृषी विभागाची कारवाई : लाखोंचा मुद्देमाल जप्त, एकाला केली अटक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८आर्वी-** खरीप हंगामा च्या तोडावर बोगस बियाण्यांचा सुळसुळाट असल्याने कृषी विभाग व जिल्हास्तरीय भरारी पथकाने कारवाई करत आर्वी येथील वर्धा मार्गवर असलेल्या अवैधरित्या एचबीटी कापूस बियाण्यांचे पॅकिंग व विक्री सुरू असलेल्या अवैध कारखान्यावर छापा टाकला. या कारवाईत बियाणे पॅकिंगसाठी वापरण्यात येणाऱ्या यंत्रसामग्रीसह २९ लाख ४६ हजार ८४६ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून एकाला अटक करण्यात आली आहे.



वर्धा मार्गावरील खान पेट्रोल पंपाजवळील बांधकामाधीन घराशेजारी असलेल्या खोलीत अवैधरित्या एचबीटी कापूस बियाण्यांचे पॅकिंग करून विक्री केली जात असल्याची माहिती आर्वी पंचायत समितीचे कृषी अधिकारी व गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक संजय बमनोटे यांना मिळाली. या माहितीच्या आधारे त्यांनी जिल्हास्तरीय भरारी पथक प्रमुख संदीप ढोणे व जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक प्रमोद पेटकर यांच्यासह घटनास्थळी धाव घेत चौकशी सुरू केली. तपासादरम्यान तेथे संजय गोपाळे नामक व्यक्ती आढळून आला. खोलीबाहेर पोत्यांमध्ये खुले कापूस बियाणे आढळून आले. चौकशीदरम्यान संबंधित व्यक्तीने समाधानकारक उत्तरे दिली नाहीत तसेच आतील खोली दाखवण्यास नकार दिला. अमरावतीहून बियाणे आणणाऱ्या वाहनाचा उल्लेख करून तो तेथून निघून गेला. अधिकाऱ्यांनी घटनास्थळी नजर ठेवली. मात्र, संशयित वाहन न आल्याने पोलिसांच्या मदतीने खोलीचे कुलूप उघडण्यात आले. पंचांच्या उपस्थितीत ई-पंचनामा करून तपासणी केली असता बियाणे पॅकिंगसाठी वापरण्यात येणाऱ्या विविध यंत्रसामग्रीचा साठा आढळून आला. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास उपविभागीय पोलिस अधिकारी चंद्रशेखर ढोले, ठाणेदार सतीश डेहणकर यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय संतोष चौहान व त्यांची चमू करीत आहे.

### विविध यंत्रसामग्री जप्त

या कारवाईत ऑटोमॅटिक सीलिंग मशीन, पार्टिकल फिलिंग मशीन, इलेक्ट्रिक बॅग क्लोजर, हँड हेल्ड इंकजेट प्रिंटर, हीट सीलर मशीन, इलेक्ट्रॉनिक वजन काटा तसेच बियाणे पॅकिंगसाठी वापरले जाणारे १४ हजार ९९५ रिकामे प्लास्टिक पाकिट असा एकूण एक लाख २२ हजार ९०९ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

---

### तखतमल मार्केटसह जुन्या शहरातील

# जर्जर इमारती तात्काळ पाडा

## नगरसेवक चंदू खेडकर यांची मनपा आयुक्तांकडे कारवाईची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती-** अमरावती शहरात पावसाळा तोंडावर आला असताना मुख्य शहर परिसरातील प्रसिद्ध 'तक्तमल मार्केट' तसेच जुन्या शहरातील अत्यंत जर्जर व धोकादायक इमारतींमुळे नागरिकांच्या जीविताला मोठा धोका निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक १ चे नगरसेवक चंद्रकांत उर्फ चंदू खेडकर यांनी अमरावती महानगरपालिका आयुक्तांना निवेदन देत तात्काळ कठोर कारवाईची मागणी केली आहे.

खेडकर यांनी आयुक्तांची प्रत्यक्ष भेट घेऊन शहरातील शिकस्त इमारतींच्या गंभीर समस्येकडे लक्ष वेधले. 'तक्तमल मार्केट' हे शहरातील प्रमुख




व्यापारी केंद्र असून येथे दररोज हजारो नागरिकांची व व्यापाऱ्यांची वर्दळ असते. मात्र सद्यस्थितीत ही इमारत अत्यंत धोकादायक अवस्थेत असून कोणत्याही क्षणी दुर्घटना घडू शकते, असा इशारा त्यांनी दिला.

याशिवाय जुन्या शहरातील अनेक वाडे व इमारती पूर्णपणे जीर्ण झाल्या असून मागील काही वर्षांत अशा इमारती कोसळून जीवितहानीच्या घटना घडल्या आहेत. आगामी पावसाळ्यात मोठा अनर्थ टाळण्यासाठी प्रशासनाने तातडीने उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.केवळ नोटिसा बजावून प्रशासन जबाबदारी टाळू शकत नाही. वेळीच कारवाई न झाल्यास होणाऱ्या कोणत्याही जीवितहानीची संपूर्ण जबाबदारी महानगरपालिका प्रशासनाची राहील, असा थेट इशाराही खेडकर यांनी दिला.

निवेदनात तक्तमल मार्केटसह सर्व धोकादायक इमारतींचे तात्काळ स्ट्रक्चरल ऑडिट करणे, नागरिकांना सुरक्षित स्थळी स्थलांतरित करणे तसेच अत्यंत जर्जर इमारतींवर निष्कासनाची कठोर कारवाई करावी, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत. या निवेदनाच्या प्रती शहर अभियंत्यांनाही देण्यात आल्या असून प्रशासनाने २४ तासांत ठोस पावले उचलावीत, अशी मागणी करण्यात आली आहे.

---

# विधान परिषदेसाठी पंचवीस इच्छुकांनी घेतले अर्ज

## नामांकन दाखल करण्यासाठी तीनच दिवस

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती-**विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाची रणधुमाळी सुरू झाली असून राजकीय पक्षांचे उमेदवार जाहीर झालेले नाहीत. अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत एक जून आहे. आतापर्यंत पंचवीस इच्छुकांनी ४५ अर्जांची उचल केली असली तरी एकाही उमेदवाराचा अर्ज दाखल झालेला नाही. पक्षीय उमेदवारांकडे राजकीय वर्तूळाचे लक्ष लागले असून त्यांची नावे जाहीर झाल्यानंतरच खरी रंगत येणार आहे. दरम्यान, बुधवारी (ता.२७) चार इच्छुकांनी अर्ज घेतलेत. महाराष्ट्र विधान परिषदेच्या अमरावती स्थानिक स्वराज्य




संस्थेची निवडणूक १८ जून रोजी होऊ घातली आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सोमवार २५ मेपासून नामांकन दाखल प्रक्रियेला सुरवात झाली. जिल्हाधिकारी कार्यालयात सकाळी ११ ते दुपारी तीन वाजेदरम्यान नामांकन अर्ज उचल व स्वीकारण्याची प्रक्रिया सुरू आहे. बुधवारी (ता.२७) चार इच्छुकांनी पाच नामांकन अर्ज उचललेत. यामध्ये सचिन डोके, अण्णाजी कुंबालकर, अ. नाजीम अ. रऊफ, सुरेश मेश्राम यांचा समावेश आहे. भाजपकडून माजी राज्यमंत्री प्रवीण पोटे यांनी स्वतःसाठी व पत्नीसाठी अर्ज घेतले आहेत. तर भाजपचे जिल्हाध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांच्यासह काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख, माजी आमदार वीरेंद्र जगताप यांनी अर्जांची उचल केली आहे. इतर दिग्गजांमध्ये नागपूरचे व्यावसायिक हर्षजित देशमुख यांचा प्रामुख्याने समावेश आहे. अर्ज दाखल करण्यासाठी तीन दिवस शिल्लक आहेत.

---

# शिष्यवृत्तीचे हजारो अर्ज प्रलंबित, महाविद्यालयांची अनास्था

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८अमरावती**

अमरावती जिल्ह्यात महाविद्यालयांकडून दाखविण्यात आलेल्या अनास्थेमुळे हजारो विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे अर्ज प्रलंबित असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. महाविद्यालय स्तरावर २३३२ तर विद्यार्थी स्तरावर १९४२ अर्ज प्रलंबित असल्याची माहिती आहे. महाडीबीटी डॅशबोर्डानुसार अद्यापही २०१९-२० ते २०२५-२६ या वर्षातील महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे अर्ज प्रलंबित आहेत. महाविद्यालयांनी शिष्यवृत्तीचे अर्ज विहीत मुदतीत जिल्हा कार्यालयांकडे पाठविणे अपेक्षित असताना जिल्ह्यातील अनेक महाविद्यालयांनी ही बाब गंभीरपणे घेतली नाही. अर्ज मंजुरीकरिता ते समाजकल्याणच्या सहायक आयुक्तांकडे सादर करण्याची सूचना वेळोवेळी देण्यात आल्यानंतर सुद्धा महाविद्यालयांनी त्याकडे पाठ फिरविली. ही बाब अतिशय गंभीर असल्याचे सहायक आयुक्त राजेंद्र जाधवर यांनी सांगितले. याशिवाय महाविद्यालय स्तरावर प्रलंबित असलेले पात्र अर्ज ३१ मेपर्यंत जिल्हा लॉगीनवर पाठविण्यात यावे तसेच विद्यार्थ्यांच्या लॉगीनकडे त्रुटी पूर्ततेकरिता परत केलेल्या अर्जांची त्रुटीपूर्तता त्वरित करावी, असे निर्देश महाविद्यालयांना देण्यात आले आहेत. विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्यास त्याची जबाबदारी सर्वस्वी प्राचार्यांची राहील, असेही समाजकल्याणचे सहायक आयुक्त राजेंद्र जाधवर यांनी स्पष्ट केले.

---

# संत अच्युत महाराजांच्या पादुकांचे पूजन



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती-** वंदनीय संत अच्युत महाराज यांच्या पादुका दर्शनाचा सोहळा वल्लभनगर येथील नंदकिशोर पेटकर यांच्या निवासस्थानी आयोजित करण्यात आला होता. यावेळी भाविक-भक्तांनी चांगलीच गर्दी केली होती. याप्रसंगी संत सचिन देव महाराज यांनी आपल्या मधुर वाणीतून गुरुमहिमा वर्णन केला. पादुका पूजन, आरती व महाप्रसादाचा सर्वांनी लाभ घेतला. नंदकिशोर पेटकर यांनी आपल्या प्रास्ताविकात सांगितले की, या अधिकमासामध्ये सकाळी साडेअकरा वाजता संत सचिन देव महाराजांचे आगमन झाले. गुरुवारी गुरुपुष्यामृतसुद्धा होते. आदल्या दिवशी संत अच्युत महाराज गुरू परिवारातील महिलांनी श्री दुर्गा सप्तशतीचे पारायण केले. सचिन महाराजांनी आपल्या प्रवचनामध्ये तीन प्रकारचे चरित्र सांगितले. राजकारणी लोकांचे चरित्र, सामाजिक लोकांचे चारित्र्य आणि सद्गुरुचे चरित्र. नंतर त्यांनी भागवत गीतेतील श्रीकृष्णाने सांगितलेले योग समजावून सांगितले व गुरुपुष्यामृत योग असल्यामुळे गजानन महाराज विजयग्रंथ आणि गजानन महाराजांची महिमा समजावून सांगितली. चतुर्भुज गुरुजी यांनी वंदनीय श्रीसंत अच्युत महाराज यांच्या हार्ट हॉस्पिटलबाबत विस्तृत माहिती दिली. या कार्यक्रमाला परिसरातील सर्व भाविक भक्त आणि गुरू परिवारातील भक्त उपस्थित होते.

---

# आयजी महेश पाटील यांनी पदभार स्वीकारला

## पाचही जिल्ह्यातील सुरक्षा व्यवस्थेचा घेतला आढावा

**विदर्भ प्रजासत्ताक**



**दि.२८अमरावतीः** महेश पाटील यांनी अमरावती विभागाचे नवीन पोलीस महानिरीक्षक (आयजी) म्हणून पदभार स्वीकारला. राज्य सरकारने वरिष्ठ आयपीएस अधिकाऱ्यांच्या नुकत्याच केलेल्या बदल्या केल्या होत्या. यामध्ये आयजी रामनाथ पोकडे यांची बदली करण्यात आली. यानंतर, महेश पाटील यांची अमरावती विभागात नियुक्ती करण्यात आली. पदभार स्वीकारल्यानंतर पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस अधीक्षक निकेतन कदम आणि अनेक वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले. गुरुवारी बकरी ईद सणाच्या पार्श्वभूमीवर, नवीन आयजी महेश पाटील यांनी अमरावती शहरासह विभागातील पाच जिल्ह्यांमधील सुरक्षा आणि सुरक्षा व्यवस्थेचा तात्काळ आढावा घेतला. यापूर्वी, त्यांनी मुंबई आणि ठाणे विभागांमध्ये अतिरिक्त पोलीस आयुक्त म्हणून काम केले. २०२३ मध्ये, मुंबई दहशतवादविरोधी पथकातील पोलीस उपमहानिरीक्षक पदावरून ठाणे पश्चिम प्रादेशिक विभागातील अतिरिक्त पोलीस आयुक्त पदावर बदली झाली.

---

# आदिवासी विभागात ऑनलाइन बदल्या शिक्षकेतर गटातील ८९ जणांना ऑर्डर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि,२८अमरावती-** अमरावती अपर आयुक्तालयाच्या हद्दीतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बदल्यांची प्रक्रिया ऑनलाइन राबविल्या गेली. पहिल्या टप्प्यात शिक्षकेतर अशा ८९ जणांना त्यांनी नवीन दिलेल्या ठिकाणी रुजू व्हावे, असे आदेश देण्यात आले. २०२६ मध्ये शिक्षक व शिक्षकेतर गटातील १७३ जण बदलीसाठी पात्र होते. दरवर्षी इनकॅमेरा ही बदलीप्रक्रिया राबविण्यात येत होती. त्यासाठी दोन ते दिन दिवसांचा कालावधी जात होता.

शिवाय औरंगाबाद जिल्ह्यापासूनचे कर्मचारी व अधिकाऱ्यांना नव्या बदलीचे स्थान मिळावे म्हणून समुपदेशनाकरिता अपर आयुक्तालय, अमरावती येथे बोलविण्यात येत होते. त्यात त्यांना वेळ आणि प्रवासाचा त्रास सहन करावा लागत होता. त्यामुळे अनेकांना मनस्ताप सहन करावा लागायचा.

यापूर्वी बदलीप्राप्त लोकांच्या मुलाखती या इनकॅमेरा होत होत्या. यावेळी पहिल्यांदाच बदलीसाठी सात प्रकल्प कार्यालयातील जे १७३ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी प्राप्त होते. त्यांना एटीसी कार्यालयातून एक लिंक देण्यात आली होती. त्यावर त्यांना जॉइन होण्यास सांगितले. बुधवारी (ता. २७) शिक्षकेतर कर्मचारी, कनिष्ठ लिपीक, गृहपाल, महिला व पुरुष अधीक्षक, अधीक्षिका या गटांचा समावेश होता. जे पर्याय उपलब्ध आहेत, त्याठिकाणी रुजू व्हावे, असे आदेशही देण्यात आले. अमरावतीच्या एटीसी आयुषी सिंह व उपायुक्त श्रीकांत धोटे यांनी संवाद साधून समुपदेशन केले. उर्वरित ८४ शिक्षक व इतर प्रवर्गाच्या मुलाखती या उद्या शुक्रवारी (ता. २९) ऑनलाइन पद्धतीनेच केल्या जाणार आहे. शुक्रवारी होणाऱ्या बदलीप्राप्त शिक्षकांचे ऑनलाइन समुपदेशन कसे होते, याकडे लक्ष लागून आहे.


> बदलीप्राप्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सुचविलेले पर्याय आणि उपलब्ध परिस्थिती, याचा सारासार विचार करूनच नवीन ठिकाणी बदलीवर पाठविल्या जाते. त्यात पारदर्शकता ही अग्रभागी आहे. -आयुषी सिंह, अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, अमरावती.

---

# राज्यस्तरीय नृत्य स्पर्धेत ८५ कलावंतांचा सहभाग

## महाराष्ट्रभरातील ८५ स्पर्धकांचा सहभाग; अद्विता राऊत लावणी स्पर्धेत प्रथम

**विदर्भ प्रजासत्ताक**



**दि.२८अमरावती-** धनश्री सामाजिक व सांस्कृतिक प्रतिष्ठानतर्फे आयोजित राज्यस्तरीय नृत्य स्पर्धेला महाराष्ट्रभरातील नृत्यप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यंदा प्रथमच विविध नृत्यप्रकारांचा समावेश असलेली राज्यस्तरीय स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत एकूण ८५ स्पर्धकांनी सहभाग नोंदवत आपली कलागुणांची चमक दाखविली. शनिवारी (ता. २३) रहाटगाव येथील स्मृतिशेष सचिन चौधरी सभागृह, जिजाऊ प्रतिष्ठान मराठा नगरी येथे सकाळी ११ ते रात्री १० वाजेपर्यंत स्पर्धा पार पडली. बॉलीवूड, हॉलीवूड, क्लासिकल, वेस्टर्न, लावणी आदी विविध नृत्यप्रकारांचे सादरीकरण यावेळी करण्यात आले. उद्घाटन महापौर श्रीचंद तेजवानी यांच्या हस्ते झाले. यावेळी स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, जिजाऊ प्रतिष्ठानचे अध्यक्ष अश्विन चौधरी, सीमाताई बोके, मंगेश मनोहरे, प्रेमकुमार बोके, प्रीती साहू, श्रुती आगलावे व ड. नीता डाखोडे उपस्थित होत्या. राज्यस्तरीय लावणी स्पर्धेत अद्विता नीलेश राऊत (अमरावती) हिने प्रथम क्रमांक पटकावला. समारोप व बक्षीस वितरण कार्यक्रमात मध्यवर्ती कारागृहाच्या अधीक्षिका कीर्ती चिंतामणी, रील स्टार प्रज्ञा राऊत, जयश्री वानखडे, प्रकाश राऊत आणि दिलीप हटवार यांच्या हस्ते विजेत्यांना रोख पारितोषिक, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. स्पर्धेचे परीक्षण कोरिओग्राफर मनीष पाटील, आकाश बिजवे आणि जुनघरे यांनी केले. यशस्वीतेसाठी अध्यक्ष मंजू ठाकरे, सचिव आरती बोंदरकर यांच्यासह प्रतिष्ठानच्या पदाधिकारी व सदस्यांनी परिश्रम घेतले.

---

# मोर्शी तालुक्यातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना ६ तास वीज देऊन सरकारची क्रूर थट्टा !

## हजारो संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचे कोट्यवधींचे नुकसान होण्याची शक्यता !

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२८ मोर्शी**

विक्रमी संत्रा उत्पादनासाठी राज्यभर प्रसिद्ध असलेल्या मोर्शी तालुक्यात ऐन उन्हाळ्यात कृषी पंपांना केवळ ६ तास वीजपुरवठा करून शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम सुरू असल्याचा संतप्त आरोप राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे मोर्शी तालुका अध्यक्ष रुपेश वाळके यांनी केला आहे. वाढत्या तापमानामुळे संत्रा बागांना वेळेवर व पुरेसे पाणी देणे अत्यावश्यक असताना महावितरणकडून अपुरा वीजपुरवठा केला जात असल्याने हजारो एकरांवरील संत्रा बागा धोक्यात आल्या आहेत.

सध्या तापमानाचा पारा ४५ अंशांच्या पुढे जात असताना संत्रा झाडांना नियमित पाणी मिळणे गरजेचे आहे. मात्र दिनांक २७ मे पासून केवळ ६ तास वीज मिळत असल्याने अनेक शेतकऱ्यांना संपूर्ण बागेला पाणी देणे अशक्य होत आहे. परिणामी फळगळ, झाडांवर ताण, उत्पादनात घट आणि भविष्यातील हंगामावर परिणाम होण्याची भीती निर्माण झाली आहे.

एकीकडे सरकार शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीच्या घोषणा करत असताना दुसरीकडे संत्रा उत्पादकांना आवश्यक असलेला वीजपुरवठाच मिळत नसल्याने सरकारच्या धोरणावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. लाखो रुपये खर्च करून संत्रा बागा उभ्या करणाऱ्या शेतकऱ्यांना आता



आपल्या पिकाचे संरक्षण करण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे.

विशेष म्हणजे, या गंभीर प्रश्नाकडे स्थानिक लोकप्रतिनिधी आणि संबंधित प्रशासन दुर्लक्ष करत असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. संत्रा उत्पादक संकटात असताना त्यांच्या मदतीसाठी कोणीही पुढे येत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये प्रचंड नाराजी पसरली आहे.

राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे मोर्शी तालुकाध्यक्ष रुपेश वाळके यांनी इशारा देत म्हटले आहे की, संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना तात्काळ दिवसा किमान १० तास अखंड वीजपुरवठा करण्यात यावा. अन्यथा महावितरण कार्यालयावर तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल. शेतकऱ्यांच्या घामाची किंमत न करणाऱ्या प्रशासनाला आंदोलनाच्या माध्यमातून जागे केले जाईल.

मोर्शी तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांचे अर्थकारण संत्रा पिकावर अवलंबून आहे. त्यामुळे सरकार आणि महावितरणने तातडीने हस्तक्षेप करून दिवसा १० तास वीजपुरवठा सुरू करावा, अन्यथा शेतकऱ्यांच्या रोषाला सामोरे जाण्याची तयारी ठेवावी, अशी तीव्र भावना आता शेतकरी व्यक्त करत आहेत.

मोर्शी तालुक्यातील संत्रा उत्पादक शेतकरी ऐन उन्हाळ्यात पाण्यासाठी झगडत असताना सरकार आणि स्थानिक लोकप्रतिनिधी मात्र बघ्याची भूमिका घेत आहेत. कृषी पंपांना दिवसा १० तासांऐवजी केवळ ६ तास वीज देणे म्हणजे शेतकऱ्यांचा अंत पाहण्याचा प्रकार आहे. एका बाजूला शेतकऱ्यांना उत्पादन वाढविण्याचे सल्ले दिले जातात, तर दुसऱ्या बाजूला पिके वाचविण्यासाठी आवश्यक असलेली वीजच दिली जात नाही. हा शेतकरीविरोधी कारभार आहे.

# मनपा आयुक्त वर्षा लड्डा यांची प्रधानमंत्री आवास योजनेच्या प्रकल्पांची पाहणी

## लाभार्थ्यांशी साधला संवाद ; विकासकांना बांधकाम तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती–**

शहरातील प्रधानमंत्री आवास योजना (पीएमएवाय) घटक क्र. ३ अंतर्गत सुरू असलेल्या विविध गृहनिर्माण प्रकल्पांची अमरावती महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा यांनी प्रत्यक्ष मौका पाहणी करून कामांचा सविस्तर आढावा घेतला. शहरातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरजू नागरिकांना दर्जेदार व सुरक्षित निवास उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सुरू असलेल्या या प्रकल्पांबाबत आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या.या पाहणी दौऱ्यादरम्यान मौजे नवसारी सर्व्हे नं. १२९/२ मधील प्लॉट नं. १०७ ते ११३ येथे उभारण्यात आलेल्या एकूण ४८ सदनिकांची पाहणी करण्यात आली. त्यानंतर याच सर्व्हे क्रमांकातील प्लॉट नं. ९१ ते ९७ येथील आणखी ४८ सदनिकांचा आढावा घेण्यात आला. तसेच मौजे राहटगाव सर्व्हे नं. १९९/३ येथील ४८ सदनिका, सर्व्हे नं. ११६/२ मधील ३२ सदनिका आणि सर्व्हे नं. १२७/२ मधील ८६ सदनिकांची प्रत्यक्ष तपासणी करण्यात आली. सदनिकांमधील बांधकामाची गुणवत्ता, पाणीपुरवठा, वीज व्यवस्था, स्वच्छता, अंतर्गत रस्ते तसेच इतर मूलभूत सुविधांची पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या.पाहणीदरम्यान आयुक्त वर्षा लड्डा यांनी लाभार्थींना हस्तांतरित करण्यात आलेल्या सदनिकांना भेट देऊन रहिवाशांशी थेट संवाद साधला. सदनिकांमध्ये उपलब्ध करून देण्यात आलेल्या सुविधांबाबत माहिती घेत नागरिकांच्या अडचणी जाणून घेतल्या. यावेळी अनेक लाभार्थींनी शासनाच्या प्रधानमंत्री आवास योजनेमुळे स्वतःचे घर मिळाल्याबद्दल समाधान व्यक्त केले. काही ठिकाणी प्रलंबित असलेल्या कामांबाबत नागरिकांनी मांडलेल्या समस्या तातडीने सोडविण्याच्या सूचना आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. यावेळी मुलभुत सुविधा उपलब्ध करुन देण्याचे निर्देश दिले.यावेळी आयुक्तांनी संबंधित विकासकांना बांधकामाची गुणवत्ता अबाधित ठेवत उर्वरित कामे निर्धारित वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश दिले. प्रकल्पांमधील प्रलंबित पायाभूत सुविधा, परिसर स्वच्छता, ड्रेनेज व्यवस्था आणि सार्वजनिक सुविधा लवकरात लवकर कार्यान्वित करण्यावर विशेष भर देण्यात आला. लाभार्थ्यांना कोणत्याही प्रकारची गैरसोय होणार नाही याची दक्षता घेण्याचे आदेशही त्यांनी दिले.प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत सुरू असलेल्या या गृहनिर्माण प्रकल्पांमुळे शहरातील अनेक गरजू कुटुंबांचे स्वतःच्या घराचे स्वप्न साकार होत असून, या योजनांची अंमलबजावणी अधिक प्रभावी व पारदर्शक पद्धतीने करण्यासाठी महानगरपालिका प्रशासन कटिबद्ध असल्याचे यावेळी आयुक्त वर्षा लड्डा यांनी सांगितले.सदर पाहणी दौऱ्यात अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त नरेंद्र वानखडे, उपअभियंता शरद तिनखेडे, लक्ष्मण पावडे, नंदकिशोर तिखिले, आशिष अवसरे, जनसंपर्क अधिकारी भूषण पुसतकर, पीएमएवाय कक्षाचे कर्मचारी विपिन त्रिवेदी, जीशान अली, प्रज्वल शेंडे, निखील राऊत, विकासक सोनल गुप्ता तसेच इतर कर्मचारी उपस्थित होते.



# अमरावतीत बकरी ईद उत्सहात



अमरावतीत बकरी ईद (ईद-उल-अधा) निमित्त हजारो मुस्लीम बांधवांनी शहरातील हैदरपुरा ईदगाह मैदानावर आणि शहरातील विविध मशिदींमध्ये एकत्रित येत अत्यंत उत्साहात सामुहिक नमाज अदा केली मरकज अहले सुन्नत मस्जिद मिस्कीन शाह मियांचे इमाम मुफ्ती शरफोद्दीन हे ईदची नमाज अदा करून घेतली नमाज पठणानंतर उपस्थितांनी एकमेकांना आलिंगन देत 'ईद मुबारक'च्या शुभेच्छा दिल्या आणि शहरात शांतता व सलोख्याचे वातावरण पाहायला मिळाले.

# शेतकऱ्यांची खते खरेदीसाठी लगबग

## शेतकऱ्यांना भाववाढीची भीती, पावसाळा आला तोंडावर



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

पावसाळा काही दिवसांवर येऊन ठेपला असून खरीप हंगामाच्या तयारीला जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी वेग दिला आहे. रासायनिक खतांच्या संभाव्य दरवाढीची चर्चा सुरू असल्याने शेतकरी आतापासूनच डीएपी, यूरिया, एनपीके आदी खतांची खरेदी करण्यासाठी कृषी सेवाकेंद्रांकडे धाव घेत आहेत. अनेक शेतकरी आगाऊ पैसे भरून खते बुक करून ठेवत असल्याचे चित्र सध्या जिल्ह्यातील ग्रामीण भागात गावा गावात पाहायला मिळत आहे. खरीप पेरणीच्या काळात खतांचा तुटवडा निर्माण होऊ शकतो तसेच अचानक दरवाढ झाल्यास आर्थिक फटका बसू नये, यासाठी शेतकरी आधीच नियोजन करीत आहेत. नेरपिंगळाई परिसरातील कृषी केंद्रांवर सकाळपासूनच शेतकऱ्यांची गर्दी होत असून काही ठिकाणी खतांचा मर्यादित साठा असल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेषतः सोयाबीन, कापूस, तूर पिकांसाठी लागणाऱ्या खतांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. नंतर खते मिळाली नाहीत तर पेरणी खोळंबेल, या भीतीने अनेक शेतकरी आवश्यकतेपेक्षा जास्त खते आगाऊ निश्चित करून ठेवत आहेत. काही शेतकऱ्यांनी उधारीवरही खते बुक केल्याची माहिती मिळत आहे. दरम्यान, बियाणे, औषधे, मजुरी आणि इंधनाच्या वाढत्या किमतींमुळे आधीच शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च वाढलेला आहे. त्यात खतांच्या संभाव्य दरवाढीमुळे खरीप हंगाम अधिक खर्चिक ठरण्याची शक्यता व्यक्त होत आहे. त्यामुळे शासनाने पुरेसा खतसाठा उपलब्ध करून दर नियंत्रणात ठेवावेत, अशी मागणी नेरपिंगळाई परिसरातील शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे. यावर्षी अल निनोच्या प्रभावामुळे पावसाचे प्रमाण कमी राहण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तविल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेत आणखी भर पडली आहे. कमी पाऊस झाल्यास पिकांच्या उत्पादनावर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात असून, एकीकडे अवकाळी आणि अनिश्चित हवामान तर दुसरीकडे वाढता उत्पादन खर्च अशा दुहेरी संकटाचा सामना शेतकऱ्यांना करावा लागत आहे.

# मेळघाटातील विद्यार्थ्यांना दर्जेदार गणवेश व बुटांची प्रतीक्षा

## निकृष्ट दर्जामुळे काही दिवसांतच साहित्य खराबमोफत वितरण व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८मेळघाट –**

मेळघाटातील दुर्गम व आदिवासी भागातील शालेय विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने शासनाच्या शिक्षण विभागामार्फत दरवर्षी मोफत गणवेश व बुटांचे वितरण केले जाते.

मात्र प्रत्यक्षात विद्यार्थ्यांना मिळणारे गणवेश आणि बुट अत्यंत निकृष्ट दर्जाचे असल्याने काही दिवसांतच ते खराब होत असल्याचीगंभीर बाब समोर येत आहे. यामुळे अनेक विद्यार्थ्यांना पुन्हा जुन्या कपड्यांमध्येकिंवा अनवाणी अवस्थेत शाळेत जावे लागत असल्याने पालकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्तहोत आहे. स्थानिक नागरिक आणि पालकांच्या म्हणण्यानुसार, संबंधित कंत्राटदारांकडून गणवेश व बुटांचे वितरण वेळेवर होत नाही. अनेक वेळा शैक्षणिकसत्र सुरू झाल्यानंतरही विद्यार्थ्यांना साहित्य मिळत नसल्यामुळे त्याचा थेट – परिणाम विद्यार्थ्यांच्या शिक्षणावरं आणि



आत्मविश्वासावर होत आहे.


विशेष म्हणजे वितरित करण्यात येणारे बुटकाहीदिवसांत फाटतात, तरगणवेशाचे कापड धुवाईनंतर खराब होत असल्याच्या तक्रारी वारंवार समोर येत आहेत. मेळघाटासारख्या दुर्गम आणि आर्थिकदृष्ट्या मागास भागातील विद्यार्थ्यांसाठी शासनाच्या या योजना अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जातात. मात्र गुणवत्तेचा अभाव आणि प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे योजनांचा मूळ उद्देशच अपूर्ण राहत असल्याचे चित्र आहे.विद्यार्थ्यांना चांगल्या उच्च दर्जाच्या गणवेश आणि मज़बूत टिकाऊ बुटांची व्यवस्था करून त्यांचे मोफत वितरण करण्यात यावे, अशी मागणी आता पालक व सामाजिक संघटनांकडून जोर धरू लागली आहे.तसेच गणवेश व बुटांच्या खरेदी प्रक्रियेत पारदर्शकता ठेवून संबंधित कंत्राटदारांवर कठोर कारवाई करण्यात यावी, तसेच वितरण वेळेत आणि गुणवत्तापूर्ण व्हावे यासाठी स्वतंत्र तपासणी यंत्रणा नियुक्त करण्याची मागणीही होत आहे. मेळघाटातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा पाया मजबूत करण्यासाठी शासनाने या गंभीर समस्येकडे तातडीने लक्ष देण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

# माखला गावाला न्याय मिळवून देण्याची मागणी

## राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना गावकऱ्यांनी लिहिले विविध मागण्यांचे पत्र

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८चिखलदरा**

चिखलदरा तालुक्यातील माखला हे गाव अतिशय दुर्गम व अतिसुरक्षित जंगलात आहे. या गावाला देश स्वतंत्र झाल्यापासून आजपर्यंतही मूलभूत सुविधा शासनाकडून पुरविल्या गेल्या नाहीत. त्यामुळे गावकऱ्यांनी थेट देशाच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना एक पत्र लिहून आपल्या समस्या कळविल्या व आम्हाला आपणच न्याय मिळवून द्यावा, अशी विनंती केली आहे. मेळघाटातील माखला हे अतिदुर्गम आदिवासीबहूल गाव आहे. या गावाला देश स्वतंत्र झाला तेव्हापासून आजपर्यंतही लाइट, पाणी व जाण्या-येण्यासाठी रस्ता नाही. तसेच गावामध्ये नवीन पाझर तलाव बांधकाम करण्यात यावे, २०१९ पासून नवीन विहीर व पाण्याची टाकी मंजूर झाली होती, पण अद्यापही काम चालू झाले नाही. माखला गावात वर्ग एक ते आठपर्यंत शाळा असून येथे मुलांना शिकविण्यासाठी शिक्षक द्यावे व नवीन इमारत द्यावी, अतिक्रमित शेतीला पट्टे वाटप करावे, माखला गावात आरोग्य अधिकारी व आशा वर्करची नियुक्ती करावी. वनजमिनीवर नवीन तलाव बांधकाम करण्यात यावे, सामूहिक आणि खासगी विहिरीच्या खोलीकरण करण्यासाठी सुरुंग लावून खोदकाम करण्याची परवानगी द्यावी. गावाला कनेक्टिव्हिटी टॉवर उभारण्यात यावे, जंगलात कुलदेवता आहे तेथे पूजाअर्चा करण्याची परवानगी द्यावी, १७ संवर्ग भरती लवकरात लवकर करण्यात यावी. तथापि वीज, पाणी, रस्ते, शेतीचे दावे, गावठाण या मूलभूत सुविधा आम्हाला मिळत नाहीत. त्यामुळे वन्यजीव संरक्षण कायद्यामध्ये मूलभूत सुविधेसाठी बदल करण्यात यावा, अशी मागणी गावकऱ्यांतर्फे राष्ट्रपती यांना केली आहे.




# गोठ्यात बैल नाहीत अन ट्रॅक्टरला डिझेल नाही
# खरिपाची पेरणीपूर्व मशागतीची कामे खोळंबली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

शेतीचा भार ज्यांच्या मानेवर होता त्या बैलजोडीकडे शेतकर्!यांनी पाठ फिरवली आणि शेतीच्या कामासाठी यांत्रिकीकरणाचा स्वीकार करत ट्रॅक्टरचा सहारा घेतला. परंतु, आज गोठे ओस पडले असून ट्रॅक्टरला डिझेल मिळत नसल्याने खरिपाची पेरणीपूर्व मशागतीची कामे खोळंबली आहेत. जिल्ह्यातील बहुतांश शेती ही कोरडवाहू असून अनेक कुटुंबीयांचा उदरनिर्वाह हा शेतीवर अवलंबून आहे. शेती आहे तेवढीच राहिली परंतु, लोकसंख्या वाढल्यामुळे एका घराची चार घर झाली आणि एका सातबारावर चार नावे आली. पुढे या चार सातबार्!याचे आठ ते दहा सातबारे झाले. जमिनीचे तुकडे होत गेले. मोठे वतनदार म्हणून ओळखले गेलेले आजोबांचे नातू अल्पभूधारक शेतकरी झाले. लोकसंख्या वाढीमुळे प्रत्येक गावात, शहरात वाढीव वस्ती झाली. अकृषिक कारणासाठी होत असलेला वापर यामुळे शेती कमी होत गेली. तालुक्यातील अनेक शेतकर्!यांकडे एक हेक्टर पेक्षा कमी जमीन आहे. त्यामुळे शेतकर्!यांना आता बैल सांभाळणे जिकरीचे झाल्याने ८० टक्के शेतकरी आपली शेती ट्रॅक्टरद्वारे करीत आहेत. शेती कमी झाली असल्याने बैला विना गोठे रिकामी झाले असून युध्दपरिस्थितीने परिसरातील पंपावर डिझेल मिळत नसल्याने डिझेलचा प्रचंड तुटवडा निर्माण झाला आहे. काही पेट्रोल पंपावर पेट्रोल आहे डिझेल नाही डिझेल आहे तर पेट्रोल नाही अशी स्थिती निर्माण झाली आहे. काही पेट्रोल पंपावर वाहनांच्या रांगा आणि डिझेल घेऊन जाण्यासाठी डबकीच्या रांगा लागत आहे. डिझेल मिळत नसल्याने ट्रॅक्टरची भुरभुर कमी झाली. सध्या खरिपाची पेरणीपूर्व मशागतीचे कामे करणे आवश्यक आहे. डिझेल मिळत नसल्याने ही कामे खोळंबली आहेत. गोठ्यात बैल नाहीत आणि ट्रॅक्टरला डिझेल मिळत नसल्याने शेती करणे अवघड झाले आहे. डिझेलचा तुटवडा असाच राहिला तर शेतकर्!यांना मोठी कसरत करावी लागणार आहे. यावर्षी शेती पडीक राहण्याची भीतीही व्यक्त केल्या जात आहे. भारत हा कृषी प्रधान देश आहे. कृषी क्षेत्रात मोठ्या प्रमाणात यांत्रिकीकरण झाल्याने सध्या शेतकरी ट्रॅक्टरद्वारे शेती करीत आहे. जर डिझेलच्या बाबतीत अशीच परिस्थिती राहिली तर पेरणीसह शेतातील इतर कामे करणे अवघड झाले आहे. अगोदर विविध योजनेतून सरकार मोफत देण्याचे धोरण अवलंबिल्याने शेतीच्या कामाला मजूर मिळणे कठीण झाले आणि डिझेल अभावी ट्रॅक्टर शेतात आले नाही तर शेतकर्!यांवर शेती पडीक ठेवण्याची वेळ येणार आहे हे मात्र नक्की. यामुळे पेट्रोलपंपावर डिझेलची कमतरता जाणार नाही असे नियोजन सरकारने करावे अशी मागणी शेतकरीवर्गातून होत आहे.



# मोबाईलच्या दुनियेत हरवलेल्या मुलांना फुटबॉलमुळे मिळतेय मैदानी जीवनाची नवी दिशा

## इंडिपेंडेंट क्लब चा अनोखा उपक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८ अमरावती :**

उन्हाळ्याच्या सुट्टीत मुलांनी मोबाईल, टीव्ही आणि संगणकाच्या आहारी न जाता मैदानी खेळांचा आनंद घ्यावा, या उद्देशाने अमरावतीतील काही फुटबॉल प्रेमींनी मुला-मुलींसाठी निशुल्क फुटबॉल प्रशिक्षण शिबिराचे आयोजन केले आहे. इंडिपेंडेंट क्लब, अमरावती यांच्या वतीने स्थानिक सायन्स कोअर मैदानावर सुरू असलेल्या या शिबिराला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.१ मे २०२६ रोजी सुरू झालेल्या या प्रशिक्षण शिबिराचा कालावधी सुमारे ५० दिवसांचा असून दररोज सकाळी ७ ते ८ आणि सायंकाळी ५ ते ७ या वेळेत मुलांना फुटबॉलचे व्यावसायिक प्रशिक्षण दिले जात आहे. आजच्या डिजिटल युगात मुले दिवसभर मोबाईल व टीव्हीसमोर वेळ घालवत असल्याने त्यांच्या शारीरिक व मानसिक विकासावर परिणाम होत आहे. अशा परिस्थितीत मैदानी खेळांना प्रोत्साहन देणारी ही उपक्रमशील चळवळ कौतुकास्पद ठरत आहे.या शिबिरासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून सुशील सिंह सुर्वे सर, नंदकिशोर भागवत सर आणि प्रलय वाघमारे सर कार्यरत आहेत. तसेच प्रशिक्षक म्हणून प्रवीण अण्णा डाके, सुधीर जगताप, गौरी मडावी आणि विक्की दाते हे मुलांना फुटबॉलचे तांत्रिक धडे देत आहेत.दरम्यान, आज शिबिराला योगाचार्य व डाएटिशियन डॉ. अनीता चौधरी यांनी भेट देऊन विद्यार्थ्यांना योग, फिटनेस आणि संतुलित आहार याबाबत मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे खेळासोबतच आरोग्याचे महत्त्वही विद्यार्थ्यांना समजले.या उपक्रमामुळे मुलांमध्ये शिस्त, संघभावना आणि आत्मविश्वास वाढण्यास मदत होत असून पालकांकडूनही समाधान व्यक्त करण्यात येत आहे.





